# अल्पसंख्यांक समाजातील महिलांची स्थिती, समस्या व उपाययोजना

**प्रोफेसर.डॉ. विनायक सुधाकर इंगळे**
*मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड, जि. यवतमाळ*
**श्री संदीप लक्ष्मणराव वाघ**
*संशोधक विद्यार्थी, गोपिकाबाई सीताराम गावंडे, महाविद्यालय, उमरखेड, जि. यवतमाळ*

## 1.1 प्रस्तावना (Introduction) :-

भारत हा अनेक विविधतेने नटलेला साधन संपन्न देश आहे. विभिन्न प्रकारच्या समाज संस्कृती, प्रथा, परंपरा, धर्म, जाती, वंश या देशात प्राचीन काळापासुन अस्तित्वात आहेत. देशातील सर्वच समाज घटकात आज विविधता आढळून येते. त्यामुळे आज देशात विवाह, धर्म, जात यावर आधारित कुटुंबसंख्या अस्तित्वात आहे. प्रत्येक भारतीय नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान केल्यामुळे त्याचे आचरण हे धार्मिकतेवर आधारित आहे. भारतीय समाजात बहुसंख्य विविध जातीयुक्त असा हिन्दू वर्गीय समाज असला तरी त्यामध्ये अल्पसंख्यांक समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे: भारतात धर्माच्या आधारावर अल्पसंख्यांक व बहुसंख्याक असे दोन वर्ग अस्तित्वात आले आहेत. भारतीय संविधानात अल्पसंख्यांक कोणाला म्हणायचे या संदर्भात कोणतीही स्पष्टता नाही भारतातील मुस्लिम, खिश्चन, बौद्ध, शिख, जैन व पारशी या धर्मसमुहांना अल्पसंख्यांक समाजाचा दर्जा देण्यात आला आहे. या बरोबरच भाषा आणि वंश यावर आधारित अल्पसंख्यांक समुह निश्चित केले आहेत व त्याना संविधानिक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. भारतात हिन्दु, मुस्लीम, बौद्ध, जैन, पारशी, ख्रिश्चन, शिख इत्यादी विभीन्न प्रकारच्या धार्मिक लोकांचे वास्तव्य आहे व त्यामुळे प्रत्येक धर्माला एक वेगळा दर्जा भारतीय समाजव्यवस्थेत प्राप्त झाला आहे. असे असले तरी त्यांचे दैनंदिन आचरण हे त्याच्या धर्माच्या आधारावर प्रत्येक व्यक्ती करत असतो.

भारतीय समाज व्यवस्थेत अल्पसंख्याक शब्द उच्चारला की, एक कमीपणाची भावना सर्वसामान्यांच्या मनामध्ये निर्माण होते. आज देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला असला तरी भारतीय लोकशाहीमध्ये अनेक प्रकारच्या कमतरता असल्याचे आढळून येते. परिपक्व भारतीय संविधनाने सशक्त राष्ट्र निर्माण करण्याची योग्य भुमिका बजावली असतांना सुध्दा भारतात सामाजिक अस्पृश्यता व अल्पसंख्यांकाचा डाग लागलेला आपल्याला दिसून येतो. या वर्गातील जनता विशेषत: महिला वर्ग हा मोठ्या प्रमाणात प्रताडीत अथवा दुर्बल, उपेक्षीत असलेला आपणांस दिसून येतो.

अल्पसंख्यांकाविरुद्ध भेदभावाची कृती केवळ भारतापर्यंत मर्यादित नसुन ती एक जागतीक समस्या आहे. अल्पसंख्यांक समुदायातील महिला वर्ग या मध्ये सर्वाधिक पिढीत आहे. था प्रवर्गातील महिला वर्गाला अनेकदा त्यांच्या समुदायातून आणि बाहेरुन भेदभावचा सामना करावा लागतो आणि आर्थिक, सामाजिक व राजकीय उपेक्षितांचा परिणाम या सर्व घटकांवर होतो. अल्पसंख्यांक महिला अनेकदा अत्याचार, भेदभाव, शोषण या सारख्या मार्गाने बळी पडल्याचे प्रत्ययास येते समाज व्यवस्थेमधील तुच्छ कार्य ही अल्पसंख्यांक महिला वर्गाच्या द्वारे करुन घेतली जातात व या कार्याचा अत्यल्प मोबदला दिला जात असतो. या महिलांना अप्रतिष्टीत आणि अयोग्य नोकऱ्या करण्यास भाग पाडल्याने सुद्धा दिसून येत असते याच काळ भारतातील महिला वर्ग हा पितृसत्ताक समाजाच्या तावडीत होता. त्यांना मुलभूत हक्क व अधिकार सुद्धा नाकारले जात होते या सर्वांचा संबंध समाज व्यवस्थेमधील लैंगिक असमानता आणि अत्याचाराशी होता बालविवाह, सती प्रथा, विधवा शोषण देवदासी प्रथा इत्यादी अनेक सामाजिक दुष्कृत्याचा अल्पसंख्यांक समुदायातील महिला वर्ग सामना करत होता. परंतु आधुनिकतेच्या कालखंडामध्ये अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिला वर्गामध्ये त्यांच्या सामाजिक परिस्थितीमध्ये आमुलाग्र परिवर्तन झाल्याचे आपल्याला आढळून येते. या समाजातील महिला संदर्भात असलेल्या प्राचीन प्रथा, परंपरा, रुढी, चालीरीती या दुष्कृत्यांची व्यवस्था जवळपास नष्ट झाल्याचे दिसून येते. आणि लैंगिक असमानतेचा कलंक कमी झाल्याचे स्पष्ट होते. देशातील विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतीक घडामोडी, जागरुकता, शैक्षणिक संधी आणि अगदी आरोग्य सुविधा या मुळे महिला वर्गाचे सकारात्मक परिवर्तन झाल्याचे आढळते. परंतु दुर्देवाने या सकारात्मक परिवर्तनाचा लाभ आणि बदल आपसंख्यांक समुदायातील महिला वर्गाला झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून खालील

घटकांच्या आधारे अल्पसंख्यांक महिला वर्गाच्या विविध स्थितीवर विश्लेषण करण्यात आले आहे.

**1.2 अल्पसंख्यांक शब्दाचा अर्थ :-**

एक समाज अथवा राष्ट्रामध्ये जेव्हा दोन विभिन्न प्रकारचे लोक वास्तव्य करतात आणि त्यांच्यामध्ये एका वर्गाची संख्या ही दुसऱ्या वर्गापेक्षा अर्धी किंवा कमी असते तेव्हा त्या वर्गाला अल्पसंख्यांक वर्ग समजले जाते. भारतात धर्म आणि भाषेच्या दृष्टीने विचार केला तर सामाजिक व धार्मिक आधारावर ज्या वर्गाची जनसंख्या ही 50 टक्के पेक्षा कमी असते तेव्हा त्या वर्गाला अल्पसंख्यांक म्हणून गणले जाते. भारतीय संविधानाच्या दृष्टिकोणातुन विचार केला तर 'संविधानात कुठेही अल्पसंख्यांक शब्दाची परिभाषा केलेली नाही. परंतु या मागील कारण त्या वेळेस अस्तीत्वात असलेली परिस्थीती होती. परंतु वर्तमान काळाचा आढावा घेतला तर या विषयावर गंभीरतेने विचार करणे अत्यावश्यक आहे. भारत हे लोकशाहीप्रधान, धर्मनिरपेक्ष आणि लोककल्याणकारी राज्य आहे. या देशात प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण जीवन जगण्याचा अधिकार आहे. संविधानसभेने दुरदृष्टीने विचार करुन आणि धार्मिक आधारावर अल्पसंख्यांक समाजाला संरक्षण प्राप्त करुन दिले. परंतु अल्पसंख्यांक विषयांची व्याख्या करणे अथवा त्याचा अर्थ स्पष्ट करण्याकडे दुर्लक्ष केले. बदलल्या परिस्थितीनुसार राष्ट्रीय स्तरावरच नाही तर प्रादेशीक स्तरावर सुद्धा अल्पसंख्यांकांना परिभाषीत करणे महत्वपूर्ण आहे. तसेच ज्या राज्यात सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या तसेच जनसंख्येच्या आधारावर जनता अल्पसंख्यांक आहे त्यांना अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त करुन देणे गरजेचे आहे. राज्यघटनेच्या 29 ते 30 आणि 350 (अ) ते 350 (ब) या कलमान्वये अल्पसंख्यांक शब्दाचा अनेकदा वापर करण्यात आला आहे. मात्र कुठेही या शब्दाची सुस्पष्ट व्याख्या दिलेली नाही. 1992 च्या राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाच्या कायद्याच्या दुसऱ्या विभागातील कलमानुसार मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौद्ध आणि पारशी या धर्मियांना अल्पसंख्यांक म्हणून जाहीर करण्यात आले मात्र सरकार दरबारी त्याची कोणतीही सुस्पष्ट व्याख्या नाही.

**1.3 संशोधनाची गरज :-**

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. आज देशात महिला वर्गाची जनसंख्या ही पुरुष वर्गाच्या समान अस्तित्वात आहे. प्राचीन प्रथा, परंपरा, संस्कृतीचे अधीन असलेल्या या भारतीय समाज व्यवस्थेत आजही महिला वर्गाची स्थिती ही हालाखीची व दयनीय असल्याचे निष्कर्षास येते. ग्रामीण समाजव्यवस्था, शिक्षणाचे कमी प्रमाण, चूल आणि मूल, मर्यादित जीवनशैली, आयुष्य जगण्याची विशिष्ट चौकट यामुळे महिला वर्ग आजही विकासाच्या, आधुनिकतेच्या प्रवाहापासुन कोसो दूर आढळतात. त्यातही अल्पसंख्यांक महिला वर्गाची परिस्थिती ही अज्ञान, निरक्षरता यामुळे अत्यंत दयनिय झाल्याचे पहावयास मिळते. समाजात जीवन जगतांना समाजाने महिलांना दिलेली वागणूक व त्या अनुसार त्यांची स्थिती यास आपण सामाजिक दर्जा असे म्हणतो.'

एखाद्या व्यक्तीस त्या समाजाचे दिलेले अधिकार म्हणजे सामाजिक दर्जा होय म्हणुन एखाद्या समाजातील स्त्रीयांच्या दर्जाचे अध्ययन वा अवलोकन करायचे असल्यास त्या समाजाने स्त्रीयांना प्रदान केलेल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, अधिकारावर दृष्टीक्षेप टाकणे अत्यावश्यक असतें. या आधारावरच स्त्रीयांचा सामाजिक दर्जा निर्धारीत होत असतो. सर्वांगीण विचार केला तर अल्पसंख्यांक वर्गाचे प्रश्न ही काही भारतापर्यंतच मर्यादीत समस्या नाही तर जगातील प्रत्येक देशात अल्पसंख्याक, विशेषतः महिला वर्गाच्या सक्षमीकरणाची काळजी घेणे आवश्यक आहे. देशातील केंद्र सरकार व राज्य सरकारांव्दारे अल्पसंख्यांक समाजातील महिलांच्या उत्थानाकरिता क्रियान्वित योजनांचा आढावा घेणे आवश्यक आहे. शासकीय योजनांची उपयोगिता, त्यांचा प्रचार व प्रसार तसेच झालेला विकास व योजनाबद्दल असलेली जनजागृती इ. संदर्भात सखोल आढावा घेणे आवश्यक आहे.

**1.4 संशोधनाची उदिष्ट्ये :-**

1. शासकीय योजनांच्या माध्यमातून अल्पसंख्यांक समाजातील महिलांचा झालेल्या विकासाचा आढावा घेणे.

2. अल्पसंख्यांक समाजातील महिलांमध्ये शासनाच्या विविध योजनांद्वारे सामाजिक व राजकीय जनजागृतीचे विश्लेषण करणे.

3. अल्पसंख्यांक महिलांना विविध योजनांची माहिती मिळवून देणे.

4. अल्पसंख्यांक समाजातील महिलांना येणाऱ्या राजकीय, आर्थिक व प्रशासकीय अडचणीचे अध्ययन करणे.

**1.5 अल्पसंख्यांक समाजातील महिलांची स्थिती :-**

**1. भारतातील अल्पसंख्यांक महिला व पुरुषांची तुलनात्मक लोकसंख्या :-**

भारतात महिला वर्ग हा सांखिकीयदृष्टया अल्पसंख्यांक नाही पुरुष वर्गाच्या तुलनेत अंदाजे समान आहेत. परंतु पुरुष वर्गापेक्षा महिला वर्गाकडे कमी विशेषाधीकार असल्यामुळे हा घटक अल्पसंख्यांक गट म्हणून पात्र आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 121. 1% कोटी होती ज्यामध्ये 48.5% महिला लोकसंख्या होती तर अखील भारतीय स्तरावर 1000 पुरुषांमागे 943 एवढे लिंग गुणोत्तर होते महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्यांक समुदायातील महिला व पुरुष वर्गाचे जनसंख्येच्या आधारावर तुलनात्मक अध्ययन केले तर असे दिसुन येते की, खिश्चन व जैन धर्मिय अल्पसंख्यांक समुदायामध्ये पुरुष वर्गापेक्षा महिला वर्गाची जनसंख्या अधिक आहे तर बौद्ध, शिख, व मुस्लीम समुदायात महिला वर्गापेक्षा पुरुषाची जनसंख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळते.

**2. अल्पसंख्यांक महिला वर्गाची शैक्षणिक स्थिती :-**

महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सर्वप्रथम महिला शिक्षणाचा पुरस्कार केला. महिला वर्गाला शिक्षण घेता यावे याकरीता त्यांनी सर्वप्रथम पुणे येथे मुलींची पहिली शाळा काढली आज देशात महिला वर्गाची शैक्षणिक स्थिती पाहिली तर महिला वर्गामध्ये शैक्षणीक क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन झाल्याचे सिद्ध होते. शिक्षणाच्या क्षेत्रात महिला वर्गाने अत्युच्य शिखर प्राप्त केले असले तरी भारतातील अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिला प्रवर्ग शिक्षणाच्या क्षेत्रात मागास असलेला दिसुन येतो. अल्पसंख्यांक समुदायातील पुरुष व महिला वर्गाच्या साक्षरता दरावर अध्ययन केल्यास असे लक्षात येते की, जैन धर्मिय महिला व पुरुष वर्गात तो अतिशय अल्प प्रमाणात आहे. एकुण साक्षरता दर सुद्धा जैन धर्मिय समुदायामध्ये सर्वाधिक असुन त्या खालोखाल खिश्चन अल्पसंख्यांक समुदायाचा क्रमांक लागतो. मुस्लिम अल्पसंख्यांक समुदायाच्या एकुण साक्षरता दर हा केवळ 50% असल्याचे निष्पन्न होते.

**3. अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिलांची राजकीय परिस्थिती:**

भारताचे संविधान महिलांना केवळ समतेचाच अधिकार प्रदान करत नाही तर त्यांना जीवनातील प्रत्येक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी राज्यांना विविध अधिकार प्रदान करते राज्यांनी विविध प्रकारच्या उपाययोजना करून महिलांना आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम करण्याकरीता अनेक महत्वपूर्ण योजना व धोरणांची निर्मिती केली आहे. गेल्या 60 वर्षापासुन शासनाच्या धोरणे व योजनांच्या क्रियान्वीतीमुळे अल्पसंख्यांक समुदायाच्या महिला वर्गाच्या जीवनामध्ये आमुलाग्र परिवर्तन झाल्याचे पहावयास मिळते. अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिला वर्ग हा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अत्युच्च शिखर सर करत आहे. समाजातील कनिष्ठ स्तरावरील महिला वर्ग तर राजकीय सामाजिकरणाच्या मुख्य प्रवाहात येऊन ग्रामस्तरावर सरपंच पदापर्यंत पोहचल्या आहेत तर काही महिला या संसद व विधानसभेमध्ये प्रवेशीत झाल्याचे दिसून येत आहे.

**4. अल्पसंख्यांक महिला वर्गाची सामाजिक स्थिती :-**

सामाजिक दर्जाचा जन्म हा संस्कृती, प्रथा, परंपरा, रूढी, आचार, विचार यासारख्या सामाजिक व्यवहारामधुन होत असतो. भारतीय समाजव्यवस्थेत पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रीयांचा दर्जा हा सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतीक दृष्ट्या अतिशय निम्न प्रकारचा असल्याचे आढळुन येते. 2001 मध्ये धार्मिक अल्पसंख्यांक समुदायाची एकुण वृद्धी ही 18.9% एवढी होती. यामध्ये मुस्लिम अल्पसंख्यांक महिला वर्ग हा अल्पसंख्यांक समुहाच्या महिलांच्या एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात 71.1% एवढा होता तर खिश्चन, बौद्ध, शिख, जैन यामध्ये खिश्चन महिला अल्पसख्यांक समुदाय 12.9%, शिख 96% बौद्ध 4.1% जैन 22% एवढा आहे पारशी समुदायातील अल्पसंख्यांक महिला वर्गावर दृष्टीक्षेप टाकल्यास असे निष्कर्षास येते की, 1991 च्या जनगणनेनुसार 76382 लोकसख्येवरुन त्यांची लोकसंख्या 2001 मध्ये 69601 एवढी कमी झाली आहे त्यात पुरुष वर्ग हा 33,949 व महिला वर्ग हा 35672 एवढा सिमीत झाला आहे. 2020 च्या लिंग गुणोत्तराचा आधार घेतला आहे.

**5. अल्पसंख्यांक समुदायातील महिला वर्गाचा आर्थिक आढावा :-**

भारतातील अल्पसंख्यांक समुदायातील महिला वर्गात गरिबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. साक्षरता दर कमी असणे, समाजाच्या रुढी, परंपरा, यांचे बंधन असने, रोजगाराच्या कमी संधी उपलब्ध असणे इत्यादी कारणांमुळे या समुदायातील महिला वर्ग हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला दिसुन येतो. यामध्ये जैन समुदायातील महिला

वर्गाचे 55.50% प्रमाण हे स्वतःची शेती असल्याचे असुन त्या खालोखाल बौद्ध धर्मिय महिला अल्पसंख्यांक वर्ग हा 51.46% एकदा आहे. खिश्चन समुदायातील महिला वर्ग 46.8%, शिख समुदायातील महिला वर्ग 29.00%, तर खिश्चन समुदायातील महिला वर्ग हा 29.13%, इतकी आहे. इतर वर्गामध्ये महिला कामगार वर्गाची संख्या खुप मोठी असुन यामध्ये बौद्ध 21.85%, खिश्चन 41.06%, बौद्ध 41.42%, महिला अल्पसंख्यांक वर्ग हा कृषक वर्गात मोडतो घरगुती उद्योगामध्ये सुद्धा शिख 70.55%, खिश्चन 50.51%, व बौद्ध 50. 35%, एवढा उच्च असुन मुस्लिम हे 51.48%, आहेत. इतर श्रमीक वर्गात कार्य करणाऱ्या महिला या शिख 29.66%, खिश्चन 20.13%, तर बौद्ध हे 21.85%, इतके प्रमाणात आहे.

**6. अल्पसंख्यांक महिलांच्या समस्या :-**

भारतासारख्या मुक्त लोकशाही शासनपद्धती असलेल्या देशात अल्पसंख्यांकाना कधीही दडपले जाऊ नये, त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे व या समुदायास सुरक्षीतता प्राप्त व्हावी या सारख्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची खुप मोठी शक्ती शासन व्यवस्थेजवळ असणे अत्यावश्यक असते.

अ) मुस्लीम समुदायात साक्षरता, शिक्षा, वैज्ञानिक प्रगती आणि आर्थिक विकास या क्षेत्रातील प्रगती ही अत्यंत असमाधानकारक आहे. या वर्गातील महिला समुदाय हा तर व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणामध्ये खुपच मागासलेला दिसून येतो.

आ) शिख अल्पसंख्यांक समुदायामध्ये भ्रुणहत्या आणि शिशुचे विशेषतः मुलीच्या लिंग प्रमाणाचे कमी असणे हे या समुदायातील प्रमुख सामाजिक समस्या आहे. शिख धर्मात बंजारा, लर्बाना, रामगडीया समुदाय व या प्रवर्गातील महिला वर्ग हा सामाजिक व शैक्षणिक दृष्टया अत्यंत मागासित आहे.

इ) बौद्ध धर्मियांमध्ये अधिकतर बौद्ध धर्मिय वर्ग हा शेती किंवा मजुरी या व्यवसायावर निर्भर आहे. संविधानात बौद्ध धर्मिय अल्पसंख्यांक प्रवर्ग हा अनुसूचित जाती या घटकाखाली आरक्षण प्राप्त समुदाय आहे. जरीही हा घटक इतर धर्माचे पालन करत असला तरी या समुदायाला त्यांच्या हक्कापासुन वंचीत ठेवत असल्याचे निदर्शनास येते.

ई) पारशी समुदायाचे प्रजनन दराचे प्रमाण खुप कमी असल्याचे दिसुन येते. शारीरिक व मानसिकदृष्ट्या या वर्गातील महिला वर्ग उत्तम असून सुद्धा मूल न होऊ देण्याच्या भुमिकेमुळे या वर्गाच्या जनसंख्येवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला आहे.

**7. अल्पसंख्यांक महिलांच्या सक्षमीकरणासाठीच्या उपाययोजना :-**

**1. अल्पसंख्यांक महिलांमध्ये जनजागृती करणे गरजेचे :-**

महाराष्ट्र शासनाद्वारे क्रियान्वीत योजनांमुळे अल्पसंख्यांक समुदायातील महिला वर्गाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात समाधानकारक बदल घडविण्यासाठी शासनाद्वारे जनजागृती करणे गरजेचे आहे. या करिता शिबीरे प्रशिक्षणे, कार्यशाळा घेण्यात याव्या जेणे करुन त्यांना सामाजिक, राजकीय आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील योजना आणि धोरणांबददल माहिती प्राप्त होईल.

**2. अल्पसख्यांक महिलांच्या विकासासाठी नियोजन विषयक कार्यात समन्वय साधने :-**

अल्पसंख्यांक महिला वर्गाकरिता शासनाने राबविलेल्या योजना व धोरणांद्वारे सामाजिक न्याय आर्थिक समता प्रस्थापित करण्याकरिता विकास व नियोजन विषयक कार्यात समन्वय प्रस्थापित करण्याचे कार्य शासनाद्वारे करणे अत्यावश्यक आहे.

**3. स्थानिक पातळीवरील समस्यांचे अवलोकन करणे :-**

अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिलांच्या योजनांची व धोरणांची निर्मिती ही या वर्गातील महिलांच्या सहभागाद्वारे व विचार विनिमयाद्वारे स्थानिक पातळीवरील समस्यांचे अवलोकन शासनाने करणे गरजेचे आहे.

**4. अल्पसंख्यांक महिला वर्गाचा जीवनस्तर उंचावणे :-**

महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्यांक समुदायातील महिला वर्गाचा जीवनस्तर उंचावणे, त्याचे सामाजिक, राजकीय व आर्थिक सक्षमीकरणे करणे आणि शैक्षणिक क्षेत्रात विकास घडवुन आणण्याकरिता योजना व धोरणाची आखणी करणे आवश्यक आहे.

**5. अल्पसंख्याक महिलांना आत्मनिर्भर होण्यासाठी व्यावसायिक शिक्षण मिळावे :-**

अल्पसंख्याक महिला वर्गाला आर्थिक, औद्योगिक क्षेत्रात आत्मनिर्भर करण्याकरिता अभियांत्रिकी, वैद्यकीय, तंत्रज्ञान इत्यादी प्रकारचे व्यावसायिक शिक्षण उपलब्ध व्हावे याकरिता तसेच या शैक्षणिक क्षेत्रात विविध शैक्षणिक सवलती व सुविधा मिळाव्या याकरिता शासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**6. अल्पसंख्याक महिलांचा साक्षरता दर वाढावा :-**

अल्पसख्यांक समुदायातील महिला वर्गात साक्षरता दर वाढावा, शिक्षणाप्रती त्यांच्यात जिज्ञासा निर्माण व्हावी याकरिता शैक्षणिक संस्थाना अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांचा दर्जा शासनाने प्रदान करावा व त्या संस्थांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.

**7. अल्पसंख्यांक महिलांच्या बॅंक खात्यात निधीची रक्कम थेट जमा व्हावी :-**

महाराष्ट्र शासनाच्या योजना व धोरणा संदर्भात उपलब्ध करण्यात आलेला निधी हा अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिला वर्गाच्या शासनाद्वारे संबंधित महिला वर्गाच्या बैंक खात्यात जमा करणे आवश्यक आहे. तसेच या निधीचे वितरण व विनिमय योग्य पद्धतीने होते की नाही याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

**8. अल्पसंख्यांकाच्या अनिष्ट रुढी परंपराचे निर्मुलन करण्यासाठी कठोर कायद्याची निर्मिती करुन अंमलबजावणी करावी :-**

प्राचीन प्रथा, परंपरा, रितीरिवाज, चालीरिती यासारख्या अनिष्ट प्रवृत्तीत बरबटलेल्या अल्पसंख्यांक समुदायातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याकरिता शासनाने कठोर कायदे निर्माण करुन त्याद्वारे या महिला वर्गाला न्याय मिळवुन दयावा व त्यांना विकासाच्या मुख्य धारेमध्ये समाविष्ट करण्याचे कार्य करावे.

**9. अल्पसंख्यांक विद्यार्थीनींच्या शैक्षणिक शिष्यवृत्तीमध्ये वाढ करावी :-**

अल्पसंख्यांक समुदायातील महिला वर्गात शैक्षणिक सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्र शासनाद्वारे शिष्यवृत्तीमध्ये वाढ करणे, निश्चित कालावधीत शिष्यवृत्ती प्रदान करणे, शिष्यवृत्तीची पात्रता सर्व अल्पसंख्यांक समुदायामध्ये समान पातळीवर ठरविणे इत्यादी तरतुदी करणे महत्वाचे आहे.

**1.6 सारांश :-**

'देशातील महिला वर्ग विशेषतः अल्पसंख्यांक समुदायातील महिला वर्ग हा विविध क्षेत्रात असमानतेचा, भेदभावाचा सामना करत असतांना दिसून येतो. बालविवाह, कौटुंबीक जबाबदारी, धार्मिक व कौटुंबीक बंधने, निर्णय प्रक्रियेपासुन वंचित ठेवणे, शोषण या सारख्या सामाजिक प्रथांमुळे हया वर्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याचे दिसून येते. म्हणून अल्पसंख्यांक समुदायातीलच नाही तर संपूर्ण भारतातील महिला वर्गाला सशक्त करणे हे समानते करिताच नाही तर गरिबी निवारण, आर्थिक प्रगती, आणि नागरी समाज बळकट करण्यासाठी अत्यंत उपयुक्त व महत्वाचे ठरेल.

**1.7 संदर्भग्रंथ सूची :**

**इंग्रजी संदर्भग्रंथ सूची :-**


1. Altekar, A. S., (1997), State and Government in Ancient India, New Delhi. Motilal Banarasidas Publication.
2. Bhatnagar, S., (1978), Rural local Governments in India. New Delhi, Light and Life Publisher.
3. Cencus of India (2011), Government of India.
4. Encyclopedia Britannica Dictionary (2004) Edn. P-514.
5. www.wikipedia.org
6. Mohanthy, Bidyut., (2002), Woman and Politics Empowerment. New Delhi, Institute of social science.
7. Mookerji, Radhakumud. (1958). Local Government in Ancient India. Delhi, Motilal Banarasdas Publishers.
8. National Commission for Religious and Linguistic Minorities Final Report to the Commision Headed by Justice Rangnath Mishra, April 2010 p.6.
9. Preamble., (1950). The constitution if India.
10. Prasad, R. C. (1971). Democracy and Development The Gross Roots Experience in India. New Delhi. Rachana Prakashan.
11. Rao,G.V.K., (1985). Report of The Rural Development and AdministrativeReform committee. New Delhi, Manager publication.
12. Sharma, M.L. (1987). Gandhi and Democratic Decentralision in India New Delhi, Deep and Deep Publication.

**हिन्दी संदर्भग्रंथ सूची :-**


1. अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, (2014 जाने 27). जैनसमुदाय अल्पसंख्यांक घोषित रिलीज आयडी 26413.
2. अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय. (2014 उपखंड 2. प्राधिकार से प्रकाशीत न्यु दिल्ली. 27), भारत का राजपत्र भाग 2. खंड 3.
3. ऑबेरॉय, हरनोन (1994) धार्मीक सियाओं का निर्माण सिख परंपरा में संस्कृतीपहचान और विविधता. शिकागो विश्वविदयालय प्रेस, पृष्ट 24-25.
4. कश्यप, सुभाष, (2015). हमारा संविधान, भारत राष्ट्रीय पुस्तक न्यास, पृष्ठ क. 117